**प्रेस नोट** **दिनांक - २०/१०/२०२६**

## अश्लील व्हीडिओच्या आधारे ब्लॅकमेलिंग करून ४ कोटी रूपयांची खंडणी उकळणाऱ्या महिलेस गुन्हे शाखा कक्ष-७ कडून अटक...

घाटकोपर विभागात राहणारे एका तक्रारदारास अश्लील व्हिडीओव्दारे बदनामी करण्याची धमकी देउन, तसेच जीवे ठार मारण्याची धमकी देउन सुमारे ४ कोटी रूपये उकळल्याप्रकरणी आणि आणखी खंडणीची मागणी केल्याप्रकरणी एका महिलेस गुन्हे शाखा, कक्ष-७ च्या पथकाने अटक केली आहे.

तक्रारदार हे सोन्या-चांदीच्या दुकानात मॅनेजर म्हणून काम करत असून, डिसेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ च्या दरम्यान त्यांच्या परिचयाच्या एका महिलेने त्यांना व्हाट्सअॅप वर व्हिडिओ कॉलव्दारे अश्लील व्हिडीओ चॅटींग करून त्यांचे व्हिडीओ प्रसारीत करण्याची धमकी देवुन सदर अश्लील व्हिडिओ चॅटिंग हे इंटरनेटच्या माध्यमातून पोलिसांना, न्यायालयाला आणि सी.बी.आय या विभागांना मिळाले असून त्याच्या चौकशीमध्ये तिला बोलवण्यात आल्याचे तक्रारदार यांना सांगितले. या धमकीमुळे तक्रारदार यांनी बदनामीच्या भीतीपोटी सन २०२४ पासून ते अद्याप पर्यंत  ४ रुपये करोड एवढी रक्कम तक्रारदार यांच्याकडून घेतलेली असून सदर महिला ही आणखी रकमेची मागणी तक्रारदाराकडे केली . तसेच आणखी रक्कम न दिल्यास तक्रारदार यांना हातपाय तोडण्याची व जीवे ठार मारण्याची धमकी देखील नमूद महिलेने दिलेली आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेउन यातील खंडणी मागणाऱ्या महिलेस गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ७, घाटकोपर, मुंबई यांनी सापळा रचून दिनांक १८/१०/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांच्याकडून रुपये ५ लाख इतकी खंडणीची रक्कम स्विकारताना आर. के. रेस्टॉरंट, एल.बी.एस रोड, घाटकोपर पश्चिम, मुंबई या ठिकाणी रंगेहाथ ताब्यात घेतले व तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन घाटकोपर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१२५३/२०२६ कलम ३०८(२), ३०८(५) भा.न्या.संहिता अन्वये दाखल करून सदरचा गुन्हा तपासावर घेण्यात आलेला आहे व नमूद महिलेस वरील नमूद गुन्ह्यामध्ये अटक करून पुढील तपास गु. प्र. शा., कक्ष ७, घाटकोपर युनिट यांच्याकडून करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई) श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्ण कांत उपाध्याय, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पूर्व) श्री. धर्मपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष-७ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अनिल ढोले, पो.नि. श्री. प्रदीप सरफरे, स.पो.नि. धनाजी साठे, स.पो.नि. महेश शेलार, पो.उ.नि.अजय गोल्हार, पो.उ.नि.नामदेव परबळकर, पो.हवा.०३-४६७/गलांडे, पो.हवा.०३-८३५/जाधव, पो.हवा. ०६-१९४०/राऊत, पो.हवा.०८-०८७२/होनमाने, पो.हवा.०९-०५७२/पाटील, पो.शि. ११-०७२७/सावदेकर, पो.शि.१९-०३८०/गोरडे, म.पो.शि. १८-१३१३/शिंदे, म.पो.शि. १८-१४६८/मयेकर, चा.स.फौ.९६-१६४१/बाळासाहेब कवडे यांनी पार पाडली आहे.